महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

मंजूर विकास योजना नकाशात, अभिन्यासातील खुल्या जागा रहिवास विभागात दर्शविणेबाबत कलम-१५४ अन्वये निदेश...

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ जून, २००८.

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्र. : टिपीएस-३१०८/२२०/प्र.क्र.२७/२००८/नवि-३० :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदींचे पालन करुन महाराष्ट्र राज्यातील विकास योजना शासनाने मंजूर केल्या आहेत. अलिकडच्या काळात विकास मंजूरीच्या अधिसूचनेत मंजूर अभिन्यासातील हिरव्या रंगाने दर्शविलेल्या खुल्या जागा या रहिवास विभागात समाविष्ट असल्याचे गृहीत धरण्याबाबत खालील टिप देण्यात आली आहे.

Note - "Those open spaces from sanctioned layout that are earmarked as existing open spaces (in green colour) on Development Plan are subject to change if respective layout is revised. If the layout is revised and if open spaces are shown elsewhere on Development Plan be treated as residential zone with prior approval of the Director of Town Planning, Maharashtra State, Pune."

वास्तविक पहाता सदर धोरण सर्वसाधारणपणे सर्व विकास योजनांना लागू होणे अपेक्षित आहे. तथापि काही विकास योजनांमध्ये, उक्तरोल्लिखित टिप देण्यात आलेली नाही. त्यामुळे अभिन्यास सुधारित करताना संबंधिताना अडचणी निर्माण होतात. यासर्व बाबींचा विचार करता मला दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व नगर परिषदा / महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे (उपरोक्त टिप मंजूर विकास योजनेत यापूर्वीच समाविष्ट केलेली शहरे वगळता उर्वरित सर्व) यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये खालील निदेश देण्यात येत आहेत.

निदेश

महाराष्ट्र राज्यातील सर्व नगर परिषदा / महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे (उपरोल्लिखित टिप मंजूर विकास योजनेत यापूर्वीच समाविष्ट केलेली शहरे वगळता उर्वरित सर्व) यांनी मंजूर विकास योजनेमध्ये खालील टिप समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन प्रस्ताव संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास मंजूरीसाठी सादर करावा. तसेच सदर बदल हा आजच्या दिनांकापासून अंमलात आणावा.

Note - "Those open spaces from sanctioned layout that are earmarked as existing open spaces (in green colour) on Development Plan are subject to change if respective layout is revised. If the layout is revised and if open spaces are shown elsewhere on Development

ROTA | H 1099 (350-6-08) I
HCL/UD/UD/UD-30 saturna

/ कृ.मा.प.

Plan be treated as residential zone with prior approval of the Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

Condition - Open space areas shall be unincumbered and functionable"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( शिवाजी पाटणकर )
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -
सर्व महानगरपालिका आयुक्त / महानगर आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण / मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण / सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई / मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा / मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा व नगर पंचायती

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी व माहितीस्तव
संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अखत्यारीतील सर्व विभागीय तसेच शाखा कार्यालयांना कलम १५४ अन्वयेच्या सदर निदेशाची प्रत कार्यवाहीसाठी व माहितीसाठी पाठवावी.
कक्ष अधिकारी (नगररचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

--0--

H 1844-1'31
HCL\UD\UD UD-30 saturna